महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८५ /२०२४ दि. १५/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत समृद्धी महामार्गाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कडून वडपे ते ठाणे या मार्गावरील रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू आहे. माजिवाडा उड्डाणपूल ते साकेत खाडी पावेतो रस्त्याचे कॉक्रिटीकरणाचे काम नियोजित असून सदरचे काम पावसाळा पुर्वी करणे आवश्यक असल्याने नाशिक–मुंबई मार्गिकेवरील साकेत कॉम्पेक्स कडे जाणारा सेवा रस्ता तात्पुरत्या स्वरूपात बंद करणे गरजेचे आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई नाशिक महामार्गालगत साकेत कट सेवा रस्त्याने बाळकुम, कळवा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साकेत कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर वाहने साकेत कट येथून मुंबई नाशिक महामार्गाने पुढे सरळ जावून खारेगांव कट अथवा खारेगांव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदर वाहने लोढा कट येथून डावे वळण घेवून लोढा संकुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

क) घोडबंदर कडून कापूरबावडी सर्कल येथून डावे वळण घेवून बाळकुम नाका मार्गे इच्छित स्थळी जातील

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १८/०३/२०२४ ते दि. ०१/०५/२०२४ रोजीपावेतो २४ तास अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

CamScanner

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>
संबंधित स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग आणि पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner